गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.र.क्र.१८/२०१४, (कांजुरमार्ग पो.स्टे.,गु.र.क्र.०६/२०१४) मधून उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणामध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड.श्री.राजा ठाकरे यांना सुधारित दराने व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : एसपीपी-०२१४/प्र.क्र.१०५/पोल-१०,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०३ जूलै, २०१९

संदर्भ -: १) शासन पत्र विधि व न्याय विभाग क्र.२९७६/६१/क्रिमि.जन./१६/अ शाखा, दि.११/०७/२०१६.
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एसपीपी-०२१४/प्र.क्र.१०५/पोल१०, दि.२३/०२/२०१७.
३) सह पोलीस आयुक्त (गुन्हे),मुंबई यांचे पत्र जा.क्र.४६२/सहपोआ/गुन्हे/२०१७, दि.०६/०५/२०१७ चे पत्र.

शुध्दीपत्रक:-

गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.र.क्र.१८/२०१४, (कांजुरमार्ग पो.स्टे.,गु.र.क्र. ०६/२०१४) या गुन्ह्यामधून उद्भवणाऱ्या मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील खटल्यात शासनाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन पत्र दि.११/०७/२०१६ अन्वये विधि व न्याय विभागाने ॲड.श्री.राजा ठाकरे यांची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती केलेली आहे व सदर प्रकरणी ॲड.श्री.राजा ठाकरे यांना प्रतीदिन परिणामकारक सुनावणी फी ₹२०,०००/- अदा करण्यास संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय दि.२३/०२/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

या शासन निर्णयामध्ये नमूद शासन पत्र दि.११/०७/२०१६ अन्वये करण्यात आलेली ॲड.श्री.राजा ठाकरे यांची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती कायम ठेवून, त्यांना प्रतीदिन परिणामकारक सुनावणी फी ₹२०,०००/- प्रमाणे फी अदा करण्याचे दर रद्द करण्यात येत आहे.

२. ॲड.श्री.राजा ठाकरे,विशेष सरकारी अभियोक्ता यांना आता सदर प्रकरणी खालील सुधारित व्यावसायिक फी चे दर मंजूर करण्यास या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रत्येक उपस्थितीस व्यावसायिक फी - ₹४५,०००/-

२) विचारविनिमय फी (प्रतितास) - ₹१०,०००/-

३. संदर्भ क्र.२ येथील दि.२३/०२/२०१७ या शासन निर्णयातील फी चे दर वगळता उर्वरित सर्व अटी व शर्ती कायम राहतील.

४. हे शासन शुध्दीपत्रक वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१५/ प्र.क्र.२१/२०१५/विनियम, दि.२९ जुलै, २०१५ अन्वये, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मध्ये नव्याने समावेश केलेल्या अ.क्र.४९ नियम क्र.१६६ अ, अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०७०४१२१५२८७०२९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.07.04 12:19:01 +05'30'

(किशोर शामराव भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई.
२. सह पोलीस आयुक्त (गुन्हे),मुंबई.
३. महालेखापाल(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
६. विधि व न्याय विभाग (अ शाखा),मंत्रालय,मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय -७),मंत्रालय,मुंबई.
८. ॲड.श्री.राजा बी.ठाकरे, विशेष सरकारी अभियोक्ता, ३०१, मारुती मॅन्शन,१७ रघुनाथ दादाजी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
९. निवडनस्ती पोल १०.